पाहिजेत

दैनिक अट्टल संकेतसाठी संपूर्ण महाराष्ट्रात वार्ताहर, प्रतिनिधी नेमणे आहेत. संपर्क - ९६२३४८४४८४

दैनिक

# अट्टल संकेत

ATTAL SANKET

Email : attalsanket2023@gmail.com

RNI No. MAHMAR/2023/87816

■ दैनिक ■ छत्रपती संभाजीनगर ■ वर्ष-२ ■ अंक-२८९ ■ शनिवार, दि. ८ फेब्रुवारी २०२५ ■ पाने ४ ■ किंमत २ रूपये

■ Daily ■ Chhatrapati sambhajinagar ■ Vol.2 ■ Issue -289 ■ Saturday, 8 Feb 2025 ■ Pages-4 ■ Price- 2/-


## अपात्र 'लाडक्या बहिणीं'मुळे साडेचारशे कोटींचा फटका; निकषांचे उल्लंघन करणाऱ्या पाच लाख बहिणी नावडत्या

**मुंबई (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

महत्त्वाकांक्षी अशा 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेतील निकषांचे उल्लंघन करीत गैरफायदा घेतलेल्या पाच लाख बहिणींना सरकारने अपात्र ठरविले आहे. त्यांच्याकडून सहा महिन्यांच्या अनुदानाची नऊ हजार रुपयांची रक्कम वसूल केली जाणार नाही असे स्पष्ट करण्यात आले.

विविध सरकारी योजनांचा लाभ घेणाऱ्या किंवा चार चाकी वाहने असलेल्या पाच लाख महिलांना 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेतून वगळण्यात आल्याची घोषणा महिला व बालकल्याणमंत्री आदिती तटकरे यांनी केली. निवडणुकीच्या तोंडावर कोणतीही छाननी न करता आलेले अर्ज स्वीकृत करण्यात आले होते. या योजनेअंतर्गत दरमहा १५०० रुपयांचे अनुदान पात्र महिलांना दिले जाते. आतापर्यंत सुमारे दीड लाख महिलांनी स्वेच्छेने या योजनेतून माघार घेतली आहे.

सरकारच्या या योजनेला २ कोटी ६३ लाख लाडक्या बहिणींनी नोंदणी केली होती.

### शासनाची फसवणूक

पाच लाख बहिणी अपात्र ठरल्या असल्या तरी जुलै ते डिसेंबर या काळात देण्यात आलेल्या लाभाची रक्कम परत घेतली जाणार नाही, असे आदिती तटकरे यांनी स्पष्ट केले. या महिलांना जानेवारीपासून लाभाची रक्कम दिली जाणार नाही. परंतु आधी बँक खात्यात जमा केलेली रक्कम परत घेणे उचित ठरणार नाही, असेही तटकरे यांनी म्हटले आहे. यामुळे दरमहा १५०० रुपये याप्रमाणे जुलै ते डिसेंबर या सहा महिन्यांसाठी पाच लाख बहिणींनी देण्यात आलेली ४५० कोटींची शासनाची रक्कम पाण्यात गेली आहे.

त्यापैकी २ कोटी ४१ लाख महिला पात्र ठरल्या होत्या. अजूनही ११ लाख अर्जांची छाननी प्रलंबित असून ११ लाख अर्जांची आधारशी जोडणी प्रलंबित आहे.

राज्यस्तरावरून करण्यात आलेल्या प्राथमिक तपासणीत सुमारे पाच लाख लाडक्या बहिणी अपात्र ठरल्या आहेत.

सरकारने प्रादेशिक परिवहन विभागाकडे ज्या महिलांच्या किंवा त्यांच्या कुटुंबाच्या नावावर चारचाकी वाहनांची नोंद आहे याचा शोध घेतला असता सुमारे लाखभर अपात्र म हिलांनी या योजनेचा लाभ घेतल्याचे आढळून आले असून त्यांना आता अपात्र करण्यात आले आहे.

**रक्कम वाढणार असल्यानेच कात्री?**

महायुतीने निवडणूक जाहीरनाम्यात हे अनुदान १५०० रुपयांवरून २१०० रुपये करण्याचे आश्वासन दिले होते. यानुसार अर्थसंकल्पात त्याची तरतूद केली जाईल, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी यापूर्वी जाहीर केले आहे. सरकारची आर्थिक परिस्थिती आधीच गंभीर असताना दरमहा ६०० रुपये वाढ करण्यात आल्याने सरकारच्या तिजोरीवर आणखी बोजा पडणार आहे. यामुळेच अर्थसंकल्पापूर्वी घाईघाईत ५ लाख बहिणींना अपात्र ठरवून सरकारने बोजा कमी केला आहे.

### लाडक्या बहिणींना मोठा दिलासा, दिलेला लाभ परत घेतला जाणार नाही, आदिती तटकरेंची माहिती

मुंबई: राज्यातील मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेत अपात्र ठरलेल्या महिलांसाठी ही दिलासा देणारी बातमी आहे. राज्याच्या महिला व बाल विकास मंत्री आदिती तटकरे यांनी ही महत्त्वाची माहिती एक्सवर दिली आहे. लाडकी बहीण योजनेसाठी अपात्र ठरलेल्या महिलांना वगळण्यात आले असल्याचे ट्विट केल्यानंतर आदिती तटकरे यांनी आणखी एक ट्विट केले आहे. या योजनेत अपात्र ठरलेल्या महिलांना आतापर्यंत मिळालेला लाभ हा परत घेतला जाणार नसल्याची माहिती त्यांनी या ट्विटच्या माध्यमातून दिली आहे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठी अपात्र ठरलेल्या लाभार्थ्यांना जानेवारी महिन्यापासून सन्मान निधी वितरित केला जाणार नाही. तथापि, कल्याणकारी राज्याची संकल्पना पुढे नेत असताना लाभार्थ्यांच्या खात्यात यापूर्वी जमा करण्यात आलेला सन्मान निधी परत घेणे उचित ठरणार नाही. म्हणूनच कोणत्याही लाभार्थ्यांच्या खात्यातून लाभाची रक्कम परत घेतली जाणार नाही याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी ! असे त्यांनी आपल्या एक्सवर केलेल्या पोस्टमध्ये म्हटले आहे. त्यामुळे अपात्र ठरलेल्या महिलांसाठी ही दिलासा देणारी बातमी आहे.

## अमेरिकेचे 'आयसीसी'वर निर्बंध; अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांची आदेशावर स्वाक्षरी

वॉशिंग्टन - अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी शुक्रवारी आंतरराष्ट्रीय फौजदारी न्यायालयावर (आयसीसी) निर्बंध घालण्याच्या आदेशावर स्वाक्षरी केली. इस्रायलची चौकशी करण्यावरून अमेरिकेने 'आयसीसी'वर निर्बंध घातले आहेत. 'आयसीसी'ने इस्रायलचे पंतप्रधान बिन्यामिन नेतान्याहू यांना अटक करण्याचे वॉरंट बजावले होते. अमेरिकेच्या या निर्णयाचा 'आयसीसी'ने निषेध केला आहे.

या निर्बंधांमुळे अमेरिका किंवा इस्रायल दोन्ही देश 'आयसीसी'चे सदस्य राहणार नाहीत. इस्रायलचे पंतप्रधान नेतान्याहू यांनी गाझा पट्टीत केलेल्या लष्करी कारवाईतील युद्ध गुन्ह्यांसाठी त्यांना अटक करण्याचे वॉरंट'आयसीसी'ने बजावले होते.

हमासला दिलेल्या लष्करी प्रत्युत्तरात हजारो पॅलेस्टिनी मुो-महिलांसह मारले गेले. ''आयसीसी' अमेरिका आणि तिचा जवळचा मित्रदेश इस्रायलला अवैध मार्गाने आणि निराधार लक्ष्य करीत आहे. तसेच, नेतान्याहू आणि इस्रायलचे माजी संरक्षणमंत्री यांच्याविरोधात निराधार अटक वॉरंट बजावून अधिकाराचा गैरवापर करीत आहे. 'आयसीसी'चे अधिकारक्षेत्र अमेरिका किंवा इस्रायलवर नाही. न्यायालयाने या कृतीतून अतिशय धोकादायक असा प्रघात पाडला आहे,' असे अमेरिकेने काढलेल्या आदेशात म्हटले आहे.

**ख्रिश्चनविरोधातील पक्षपातीपणासाठी टास्क फोर्स**

अमेरिकेतील ख्रिश्चनविरोधातील पक्षपातीपणा समूळ नष्ट करायचा असून, त्यासाठी अॅटर्नी जनरल पाम बाँडी यांच्या अध्यक्षतेखाली टास्क फोर्सची स्थापना करीत असल्याची घोषणा अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी केली. ख्रिश्चन समुदायाला 'लक्ष्य' करण्यात येणाऱ्या प्रकरणांची चौकशी हा टास्क फोर्स करील.

## अजिंठा बँक गैरव्यवहार प्रकरणी माजी आमदार सुभाष झांबड यांना अटक

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**



अजिंठा अर्बन बँक गैरव्यवहारप्रकरणी काँग्रेसचे माजी आमदार सुभाष झांबड यांना अखेर पोलिसांनी अटक केली आहे. गेल्या काही महिन्यांपासून पोलिस त्यांचा शोध घेत होते. अटकेनंतर वैद्यकीय तपासणी झाल्यानंतर त्यांना न्यायालयात हजर करण्यात येणार आहे.

अजिंठा अर्बन बँकेत २००६ ते २०२३ या कालावधीत तब्बल ९७ कोटी ४१ लाख रुपयांचा घोटाळा झाल्याचे उघड झाले होते. या प्रकरणी बँकेचे तत्कालीन सीईओ प्रदीप कुलकर्णी आणि बँकेचे अध्यक्ष असलेल्या माजी आमदार सुभाष झांबड यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्हा दाखल झाल्यानंतर अटकेच्या भीतीने झांबड फरार झाले होते. ते शहरातील विविध कार्यक्रमांमध्ये दिसत असतानाही आर्थिक गुन्हे शाखेला त्यांचा ठावठिकाणा लागत नव्हता. मात्र, अखेर पोलिसांनी त्यांना अटक केली.

गुन्ह्याच्या तपासादरम्यान, सुभाष झांबड यांनी ६० कोटी रुपये परतफेड केल्याची माहिती आर्थिक गुन्हे शाखेने दिली आहे. तरीही उर्वरित रक्कम आणि गैरव्यवहारातील अन्य आरोपींचा शोध सुरू असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे. अजिंठा बँक घोटाळ्यामुळे आर्थिक जगतात खळबळ उडाली असून, या प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे.

## उध्दव ठाकरे गटाची गळती थांबता थांबेना, संभाजीनगरमधील १० माजी नगरसेवक शिंदेसेनेमध्ये

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आमदार प्रदीप जैस्वाल यांच्या नेतृत्त्वाखाली मध्य मतदारसंघातील १० माजी नगरसेवकांनी शुक्रवारी एकनाथ शिंदे यांचे नेतृत्त्व स्वीकारले. अलिकडेच माजी महापौर नंदकुमार घोडले यांचाही शिवसेनेमध्ये प्रवेश झाला होता. सकाळीच प्रवेश घेऊ इच्छिणारे नगरसेवक मुंबईच्या दिशेने रवाना झाले. या म तदारसंघात माजी खासदार चंद्रकांत खैरे यांचे पुतणे सचिन आणि त्यांचा मुलगा ऋषी खैरे वगळता अन्य सर्व नगरसेवकांना आपल्या बाजूने वळविण्यात आमदार जैस्वाल यांना यश मिळाले आहे.

गेल्या काही दिवसापासून शिवसेना नेते चंद्रकांत खैरे यांनी शहरातील प्रत्येक वार्डात बैठका घेण्याचा सपाटा लावला होता. त्याला उत्तर म्हणून ठाकरे गटातून माजी नगरसेवकांना शिवसेना (एकनाथ शिंदे) गटात ओढून घेतले जात आहे. लोकसभा व विधानसभा निवडणुकीपूर्वी जिथे खैरे तिथे नंदकुमार घोडले असे चित्र होते. मात्र, घोडले यांनी ठाकरे गटाला सोडले. त्यानंतर माजी नगरसेवकांमधील म ोठा गट शिवसेनेत जाईल अशी शक्यता वर्तविण्यात येत होती. शुक्रवारी दहा जणांनी एकनाथ शिंदे यांचे नेतृत्त्व स्वीकारले. यामध्ये महापालिकेचे माजी सभापती मोघन मेघावाले, माजी सभागृह नेता किशोर नागरे, गटनेते मकरंद कुलकर्णी, अनिल जयस्वाल, रुपचंद व्यवहारे, स्वाती नागरे, ज्योती वाघमारे, मीना गायके, ज्योती पिंजरकर, सीमा खरात यांचा समावेश आहे.

उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील प्रभावी कार्यकर्त्यांना शिवसेना एकनाथ शिंदे पक्षात घेण्यावर जोर दिला जात आहे. महापालिका निवडणुकीमध्ये भाजप - शिवसेना अशी युती होणार की स्वबळावर हे दोन पक्ष निवडणुका लढविणार याचे निर्णय होणे बाकी आहे. मात्र, शिवसेना (उद्धव ठाकरे ) पक्षात येणाऱ्या कार्यकर्त्यांना प्रवेश देण्याचा सपाटा शिवसेना - भाजपने सुरू केला आहे.

**रायगडच्या पालकमंत्रीपदाचा तिढा कायम असताना भाजपची नवी खेळी**

शिवसेना (उद्धव ठाकरे ) पक्षातील कार्यकर्त्यांनी अलिकडेच एका मेळाव्यात शिवसेना नेते चंद्रकांत खैरे आणि विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे यांना जाहीरपणे सुनावले होते. आपसातील वाद कमी करा तरच लढता येईल असे सांगितले होते. या कार्यक्रमात अक्षरशः हात जोडून आता उद्धव ठाकरे यांना सोडून जाऊ नका, असे आवाहन चंद्रकांत खैरे यांना करावे लागले होते. त्यानंतरही गळती थांबता थांबेना अशी स्थिती निर्माण झाली आहे. या अनुषंगाने शिवसेना नेते चंद्रकांत खैरे यांना विचारले असता 'जे गेले त्यांच्या विरोधातील अनेक कार्यकर्ते पर्याय म्हणून उभे आहेत. त्यामुळे स्थिती बिघडली आहे असे नाही. शिवसेना जेव्हा स्थापन केली होती तेव्हा आमच्याबरोबर जेवढे होते तिथपासून पुन्हा काम करण्याची तयारी आहे. त्यासाठी बैठका घेणे सुरू केले आहे,' असे ते म्हणाले.

## मी तोंड उघडलं तर धनंजय काय पंकजा मुंडेंचंही मंत्रिपद जाईल! करुणा शर्मांचा थेट इशारा

**मुंबई (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

जर माझ्या मुलांचा माझ्याविरोधात वापर केला तर पंकजा मुंडेंनी धनंजय मुंडे सोबत काय केलं? काय कटकारस्थान रचले? मुंडे साहेबांविरोधात काय कटकारस्थान रचले गेले? किती आका आहेत? हे सगळं मी तोंड उघडणार आहे, असा इशारा देत तुम्ही मंत्री आहे, मी काही नाही. मी वाईट महिला आहे, हे मी मान्य करते. अनेक मोठ्या गोष्टी आहेत. मी तोंड उघडलं तर पंकजाताईचं पण मंत्रिपद जाऊ शकते. धनंजय मुंडेच नाही तर पंकजा मुंडे यांचे देखील पद जाईल, असा खळबळजनक गौप्यस्फोट करुणा शर्मा (घर्रीपर डहरीर) यांनी मंत्री धनंजय मुंडे (ऊहरपरपक्षरू चींपवश) आणि मंत्री पंकजा मुंडे (झरपङ्गरक्षर चींपवश) यांना थेट इशारा दिला आहे.

करुणा शर्मा म्हणाल्या की, कालच्या निकालासाठी न्यायालयाचे धन्यवाद मानते. आम्ही १५ लाखांची मागणी केली होती, मात्र ते मिळाले नाहीत, त्यामुळे आम्ही न्यायालयात पुन्हा दाद मागणार आहोत. धनंजय मुंडेची सवय आहे की, फुट टाका आणि राज्य करा. स्वतः तोंड उघडत नाही आणि माझ्या मुलाला उभं केलं. माझा मुलगा फ्रस्टेशनमध्ये होता. बरं वाईट आम्हाला झालं तर हा माणूस स्वतःला माफ करु शकणार आहे का? बापाच्या सांगण्यावरुन त्याने स्टोरी टाकली. माझ्या मुलाला किती कॉल येत होते हे सर्वांनी बघितलं आहे, असा हल्लाबोल त्यांनी धनंजय मुंडेंवर केला.


करुणा शर्मा पुढे म्हणाल्या की, ज्या वेळी माझ्या आईचं निधन झालं तेव्हा माझ्या कुटुंबावर दबाव टाकला. माझ्या बहिणीने केस टाकल्यावर माझ्यावर दबाव टाकला आणि सांगितलं की बहिणीची साथ देऊ नको म्हणून, तेव्हा मी बोलली नाही आता माझ्या मुलामुलींना माझ्याविरोधात तो उभं करत आहे. १९९६ पासून काय-काय केलं हे मी सर्व सांगेल. माझ्या नवऱ्याला त्रास दिला, २७ वर्ष मी पत्नी आहे, तरीही हे सगळं विसरुन कटकारस्थान धनंजय मुंडे माझ्याविरोधात रचतोय. मी एकच बोलते, मला बोलायचं असेल आता तर कॅबिनेटमध्ये येऊन बोलेल. तुम्ही मला रोडवर सोडू शकत नाही, मी तुमची बायको आहे, असेही करुणा शर्मा यांनी म्हटले.

वाल्मिक कराडनं मला मारहाण केली. दीपा मुधोळ यांच्या कार्यालयात मारहाण झाली, मी तेव्हा सगळ्यांना निवेदन दिलं आहे. माझ्या मुलानं सांगितलं पुरावे द्या, मग मी बघतो वाल्मिक कराडचं काय करायचं? असे त्याने सांगितले आहे. मी निवेदनं दिली, सीसीटीव्हीसंदर्भात विचारणा केली. वाल्मिक कराडनं मला त्रास दिला आहे. अजित दादा आणि देवेंद्र फडणवीस यांना एकच सांगते की महिलांबद्दल सहानुभूती असेल तर त्यांनी धनंजय मुंडे यांना पक्षातून हाकललं पाहिजे. पक्षाचा सहारा घेत ही मोठं झालेली आहेत. मी महिला आयोगात वेळोवेळी गेली, मात्र ज्यांच्यावर कारवाई झालेली आहे त्यांच्यावर कारवाईचे आदेश दिलेत. आजपर्यंत महिला आयोगानं काहीच केलं नाही. मी रेखाताईंना दिल्लीत जात निवेदन दिलं होतं की रुपाली चाकणकर यांना पदावरून हाकला, असे म्हणत त्यांनी रुपाली चाकणकर यांच्यावर निशाणा साधला.

## मेस्सीच्या मुलाचे एकाच सामन्यात तब्बल ११ गोल

लिओनेल मेस्सीची गणना जगातील महान फुटबॉलपटूंमध्ये केली जाते. लिओनेल मेस्सीने आपले नाव जगभर प्रसिद्ध केले आहे. मेस्सीने आपल्या शानदार खेळाच्या जोरावर जगभरात लाखो चाहते बनवले आहेत. २०२२ मध्ये अर्जेंटिनाला फुटबॉल विश्वचषक जिंकून देण्यात महत्त्वाची भूमिका बजावणारा मेस्सीचा मुलगा थियागो मेस्सीही आपल्या वडिलांच्या पावलावर पाऊल टाकत आहे. थियागो केवळ १२ वर्षांचा आहे, मात्र या लहान वयात त्याने एकाच सामन्यात ११ गोल करून सर्वांनाच चकित केले आहे.

थियागोने एकाच सामन्यात एकापाठोपाठ एक असे ११ गोल करत लोकांना वेड लावले आहे. लिओनेलने आपल्या खेळाने फुटबॉल





विश्वात एक वेगळी ओळख निर्माण केली असून आता त्याचा मुलगा थियागोही त्याच्या मार्गावर चालला आहे. थियागोने फुटबॉलच्या दिशेने पावले टाकली असून याचे उत्तम उदाहरण नुकतेच दाखवून दिले आहे. अंडर-१३ एमएलएस चषकाच्या एका सामन्यात त्याने एकामागून एक ११ गोल केले.

मेस्सीच्या मुलाने एकाच सामन्यात केले ११ गोल - थियागोने सामन्याच्या पूर्वार्धात ५ गोल केले. यानंतर दुसऱ्या हाफमध्ये त्याने दुहेरी हॅट्रिक केली. अशाप्रकारे, त्याने अंडर-१३ एमएलएस चषक स्पर्धेत अटलांटा युनायटेड विरुद्ध त्याच्या संघ इंटर मियामीसाठी जोरदार गोल केले. थियागोने पहिल्या हाफच्या १२व्या, २७व्या, ३०व्या, ३५व्या आणि ४४व्या मिनिटाला गोल केले. यानंतर ५१व्या, ५७व्या, ६७व्या, ७६व्या, ८७व्या आणि ८९व्या मिनिटालाही गोल करण्यात आले. अंडर-१३ एलएलएस स्पर्धेत, मेस्सीच्या मुलाची जादू अशी होती की त्याने एकट्याने आपल्या संघाला विजयापर्यंत नेले.


विरुद्ध संघातील अटलांटा युनायटेडचा कोणताही खेळाडू मेस्सीच्या मुलासमोर टिकू शकला नाही किंवा तो त्याच्या इंटर मियामी संघातील कोणत्याही खेळाडूशी स्पर्धा करू शकला नाही. १२ वर्षीय थियागोने अलीकडेच १३ वर्षांखालील एमएलएस चषक २०२५ मध्ये एकट्याने आपल्या संघाला विजय मिळवून दिला. थियागोशिवाय त्याचा सहकारी डिएगो लुना ज्युनियरने गोल केला. तर अटलांटा युनायटेडच्या एकाही खेळाडूला एकही गोल करता आला नाही. थियागोच्या उत्कृष्ट कामगिरीच्या जोरावर इंटर मियामीने अटलांटा युनायटेडचा वाईट पद्धतीने पराभव केला.

# इंग्रजांचा कर्दनकाळ : उमाजीराजे नाईक

**(आद्यक्रांतिवीर उमाजीराजे नाईक बलिदान दिन सप्ताह विशेष)**

क्रांतिकारकांचा आदर आणि त्यांचे स्मरण सर्वच जातिधर्मातील लोकांनी केले पाहिजे. मग हे राजे उमाजी नाईक असे उपेक्षितच का राहून गेले? हे आश्चर्य आहे. अशा या धाडसी उमाजीराजेंनंतर तब्बल १३ वर्षांनी-सन १८४५ला क्रांतिकारक वासुदेव बळवंत फडके जन्माला आले. त्यांनी उमाराजेंचे धोरण डोळ्यासमोर ठेवत ३०० रामोशांना सोबत घेऊन बंड सुरू केले. त्यावेळी दौलती रामोशी हा त्या बंडाचा सेनापती होता. नरवीर उमाजीराजे स्वतःच्या कार्याने एक दीपस्तंभ ठरले आहेत. त्यांचा गौरव करण्यापासून इंग्रज अधिकारीही स्वतःला रोखू शकले नाहीत. इंग्रज अधिकारी कॅप्टन रॉबर्टसन याने १८२०ला ईस्ट इंडिया कंपनीला लिहिताना म्हटले, 'उमाजीचा रामोशी समाज इंग्रजांविरुद्ध तिरस्काराने पेटला असून तो कोणत्या तरी राजकीय बदलाची वाट पाहत आहे. जनता त्यांना मदत करत असून कोणी सांगावे, हा उमाजी राजा होऊन छ.शिवाजीसारखे राज्य तर स्थापणार नाही ना?' तर मॉकिनटॉस म्हणतो, 'उमाजीपुढे छ.शिवरायांचा आदर्श होता. त्याला फाशी दिली नसती तर तो दुसरा शिवाजी झाला असता.' हे केवळ गौरवोद्गार नसून हे सत्य आहे... जर इंग्रजांनी कूटनीती आखली नसती तर कदाचित तेव्हाच भारताला स्वातंत्र्य मिळाले असते. भारताच्या इतिहासात अनेक ऐतिहासिक घटना घडल्या आहेत. काहींची नोंद झाली, काहींची दखलच घेण्यात आली नाही. सन १८५७च्या उठावापूर्वीही अनेक उठाव झाले. अशाच पहिल्या उठावाद्वारे इंग्रजांना सलग १४ वर्षे सळो की पळो करून सोडणारे व सर्व प्रथम क्रांतीचे स्वप्न पाहणारे महाराष्ट्रातील निधड्या छातीचे वीर आद्यक्रांतिकारक नरवीर ठरले गेले. ज्यांना इंग्रजांचा कर्दनकाळ म्हणूनही ओळखले जाते. ते म्हणजे राजे उमाजी नाईक!

नरवीर उमाजीराजे नाईक-खोमणे यांचा जन्म रामोशी-बेरड समाजात लक्ष्मीबाई व दादोजी खोमणे यांच्या पोटी दि.७ सप्टेंबर १७९१ रोजी पुणे जिल्ह्यातील किल्ले पुरंदर येथे झाला. वडिल दादोजी खोमणे पुरंदर किल्ल्याचे वतनदार होते. त्यामुळे उमाजीराजेंचे कुटुंब पुरंदर व वज्रगड किल्ल्याच्या संरक्षणाची जबाबदारी पार पाडत होते. त्यामुळेच त्यांना नाईक ही पदवी मिळाली होती. उमाजीराजे जन्मापासूनच हुशार, चंचल, शरीराने धडधाकट, उंचपुरे आणि करारी होते. त्यांनी पारंपरिक रामोशी हेर कला लवकरच आत्मसात केली. जसे राजे मोठे होत गेले, तसे त्यांनी वडीलांकडून दांडपट्टा, तलवार, भाला, कुऱ्हाड, तीरकमठा, गोफण वगैरे चालवण्याची कला अवगत केली. या काळात इंग्रजांनी भारतात आपली सत्ता स्थापन करण्यास सुरुवात केली होती. हळूहळू मराठी मुलुख जिंकत त्यांनी पुणे ताब्यात घेतले. इ.स.१८०३मध्ये पुण्यात दुसऱ्या बाजीराव पेशव्यास स्थानापन्न केले आणि त्याने इंग्रजांचा पाल्य म्हणून काम सुरू केले. सर्वप्रथम त्याने इतर सर्व किल्ल्यांप्रमाणे पुरंदर किल्ल्याच्या



वतनदारीचे व संरक्षणाचे काम रामोशी सम ाजाकडून काढून घेऊन आपल्या मर्जीतील लोकांकडे दिले. त्यामुळे रामोशी समाजावर उपासमारीची वेळ आली. जनतेवर इंग्रजी अत्याचार वाढू लागले. अशा परिस्थितीत करारी उमाजीराजे बेभान झाले. छत्रपती शिवरायांना श्रद्धास्फूर्तीचे स्थान देत त्यांचा आदर्श घेतला. स्वतःच्या अधिपत्याखाली स्वराज्याचा पुकार करत आपल्या देशावर परकीयांना राज्य करू देणार नाही, असा पण केला. विठोजी नाईक, कृष्णा नाईक, खुशाबा रामोशी, बाबू सोळस्कर यांना बरोबर घेऊन कुलदैवत जेजुरीच्या श्री खंडोबारायाला भंडारा उधळत शपथ घेतली व इंग्रजांविरोधात पहिल्या बंडाची गर्जना केली.

उमाजीराजे नाईक यांनी इंग्रज, सावकार, मोठे वतनदार अशा लोकांना लुटून गोरगरिबांना आर्थिक मदत करण्यास सुरवात केली. कोणत्याही स्त्रीवर अत्याचार- अन्याय झाल्यास ते भावासारखे धावून जाऊ लागले. इंग्रजांना त्रास दिल्यामुळे त्यांना सरकारने इ.स.१८१८मध्ये एक वर्ष तुरुंगवासाची शिक्षा दिली. परंतु तो काळ सत्कारणी लावत ते तुरुंगातच लिहिणे-वाचणे शिकले. या घटनेचे इंग्रज आधिकारी कॅप्टन मॉकिनटॉस याने फार आश्चर्य व कौतुक केले. तुरुंगातून सुटल्यानंतर इंग्रजांविरुद्ध त्यांच्या कारवाया आणखी वाढल्या. ते देशासाठी लढत असल्याने जनताही त्यांना साथ देऊ लागली. त्यामुळे इंग्रज मेटाकुटीला आले. त्यांना पकडण्यासाठी इंग्रज अधिकारी मॉकिनटॉस याने सासवड-पुरंदरच्या मामलेदारास फर्मान सोडले. माम लेदार इंग्रजी सैन्य घेऊन पुरंदरच्या पश्चिमेकडील एका खेड्यात गेला असता, तेथे त्यांच्यात आणि उमाजीराजेंच्या सैन्यात तुंबळ युद्ध झाले. यात इंग्रजांना पराभव स्वीकारावा लागला. उमाजीराजेंचे सैन्य डोंगरात टोळ्या करून राहत असत. एका सैन्य तुकडीत जवळजवळ ५ हजार सैनिक होते.

इंग्रजांसारख्या बलाढ्य शत्रूशी मुकाबला करायचा म्हणजे मोठे मनुष्यबळ असायला हवे. म्हणजेच सैन्य व प्रचंड खर्च आलाच. पण उद्देश महान असल्यामुळे ते साधनाअभावी थांबले नाहीत. ते छ.शिवाजी महाराजांना आदर्श मानत. असे खुद्द इंग्रज आधिकारी कॅप्टन मॉकिनटॉस याने नमूद केले आहे.

दि.२४ फेब्रुवारी १८२४ला नरवीर उमाजींनी भाबुर्डी येथील इंग्रज खजिना लुटून तो देवळाच्या देखभालीसाठी जनतेला वाटला होता. दि.२२ जुलै १८२६ साली त्यांचा राज्याभिषेक कडेपठार, जेजुरी या ठिकाणी करण्यात आला. त्यांनी छत्रचामर, अबदागीर, इ.राजचिन्हे धारण केली. दरबारात ते भिक्षुक-पुजारी यांना दक्षिणा व गोरगरिबांना दान देत असत. त्यांनी विभागनिहाय सैन्य प्रमुख व त्यांच्या तुकड्या नेमून सर्व भागात त्या तैनात केल्या होत्या. त्यांना कामे वाटून दिली होती. तसेच त्यांनी एकमेकांशी संपर्क, दळणवळण, इंग्रजांच्या बातम्या तसेच लोकांचा बातम्या, इ.कामासाठी हेरखातेही निर्माण केले होते. विभागनिहाय गुप्तहेरखाते नेमले होते. सैन्यात व गुप्तहेरखात्यात सर्व जाती-धर्माचे लोक होते. त्याच साली २८ ऑक्टोबरला त्यांच्याविरुद्ध इंग्रजांनी पहिला जाहिरनामा प्रसिद्ध केला. त्यात उमाजीराजे व त्यांचा साथीदारांना पकडणाऱ्यास मोठ्या रकमेची बक्षिसे व इनाम जाहिर केले. या क्रांतिकारकांना मदत करणाऱ्यास शिक्षाही जाहिर केली. पण जनतेने इंग्रजांना मदत केली नाही. यातून उमाजीराजेंची लोकप्रियता दिसून येते. अशाच प्रकारे दुसरा जाहिरनामा इंग्रजांनी दि.८ ऑगस्ट १८२७ साली प्रसिद्ध केला. त्यात बक्षिसाची रक्कम वाढवली व शरण येणाऱ्यास माफी देण्याचे अभिवचन देण्यात आले. तरीही कोणी मदत केली नाही. कारण लोक उमाजीराजेंना इंग्रजांविरुद्ध एक आशास्थान म्हणून पाहू लागले होते. पुढे २० डिसेंबरला झालेल्या युद्धात इंग्रजांना पराभव पत्करावा लागला. उमाजीराजेंनी ५ इंग्रज सैनिकांची मुंडकी कापून मामलेदाराकडे खलिता म्हणून पाठवली. त्यामुळे इंग्रज चांगलेच धास्तावले. कैप्टन डेव्हिसपासून लेफ्टनंटपर्यंत सर्वच लालबुंद झाले. नंतर ३० नोव्हेंबरला इंग्रजांना त्यांनी ठणकावून सांगितले की, आज हे एक बंड असले तरी असे हजारो बंड सातपुड्यापासून सह्याद्रीपर्यंत उठतील व तुम्हास जेरीस आणतील.

फक्त इशारा देऊन न थांबता त्यांनी इंग्रजांना सळो की पळो करून सोडले. इंग्रजांनी तिसरा जाहिरनामा प्रसिद्ध करून बक्षिसाची रक्कम दुप्पट केली. त्याचाही काही उपयोग झाला नाही. जंजिऱ्याचा सिद्दी नवाबने उमाजीराजे कोकणात गेले असताना त्यांना मदत मागितली होती. दि.२४ डिसेंबर १८३०ला त्यांनी आपला पाठलाग करणाऱ्या इंग्रज अधिकारी बॉईड आणि त्याच्या सैन्यावर मांढरदेवी गडावरून बंदुका, गोफणी चालवत घायाळ करून परत पाठवले होते. त्यात काहींचे प्राणही घेतले. दि.२६ जानेवारी १८३१ साली इंग्रजांनी चौथा जाहिरनामा प्रसिद्ध केला, की त्यांना पकडून देणाऱ्यास ५००० रुपये रोख बक्षिस व २०० बिघे- १०० एकर जमीन जाहिर करण्यात आली. पण तरीही कोणीही इंग्रजांना मदत केली नाही. अशा प्रकारे त्यांच्या भारताच्या स्वातंत्र्यढ्यास सर्व राजे-रजवाडे, संस्थानिक, जनता पाठिंबा देत होते.

उमाजीराजेंनी दि.१६ फेब्रुवारी १८३१ रोजी इंग्रजी सत्तेविरुद्ध एक जाहीरनाम ाच प्रसिद्ध केला. त्यात नमूद केले होते, की लोकांनी इंग्रजी नोकऱ्या सोडाव्यात. सर्व राजे-रजवाडे, सरदार, जमीनदार, वतनदार, देशवासीयांनी एकाच वेळी एकत्र येऊन जागोजागी बंड पुकारावे आणि इंग्रजांविरुद्ध अराजकता माजवावी. इंग्रजांचे खजिने लुटावेत. इंग्रजांना शेतसारा, पट्टी देऊ नये. असे करणाऱ्यास नवीन सरकारमधून जहागिरी, इनामे वा रोख पैशाची बक्षीसे मिळतील. ज्यांची वंशपरंपरागत वतने, तनखे इंग्रज सरकारमुळे गेले असतील ती सर्व त्यांना परत केली जातील. इंग्रजांची राजवट आता लवकरच संपुष्टात येणार आहे व नवीन न्यायाधिष्ठीत राज्याची स्थापना होइल. इंग्रजांना कोणीही मदत करू नये. तसे केल्यास नवीन सरकार त्यांना शासन करेल, असे सांगून उमाजीराजेंनी एकप्रकारे स्वराज्याचा पुकारच केला होता. संपूर्ण क्रांतिकारकांच्या इतिहासात अशा प्रकारचा व्यापक जाहिरनामा प्रथमच दिसतो. हे भारताच्या इतिहासातील सोनेरी पानच आहे. म्हणूनच उमाजीराजे हे आद्यक्रांतिकारक ठरतात. तेव्हापासून उमाजी हे जनतेचे राजे बनले. या सर्व प्रकारामुळे इंग्रज गडबडले आणि त्यांनी उमाजीराजेंना पकडण्यासाठी युक्तीचा वापर केला. सावकार, वतनदार यांना मोठमोठी आमिषे दाखवण्यात आली .इंग्रजांनी उमाजीराजेंविरुद्ध पाचवा जाहिरनामा प्रसिद्ध केला. माहिती देणाऱ्यास १० हजार रुपये रोख आणि चारशे बिघे जमीन बक्षीस देण्याची घोषणा केली. हा इनाम त्या काळात अगनित होता. देशद्रोही त्र्यंबक चंद्रस कुलकर्णी हा फितूर होऊन उमाजीराजेंची सर्व गुप्त माहिती इंग्रजांना दिली. दि.१५ डिसेंबर रोजी भोर तालुक्यातील उतरोली या गावी रात्री बेसावध असताना त्यांना इंग्रजांनी पकडले. पुण्यात माम लेदार कचेरीतील एका काळ्या खोलीत त्यांना ३५ दिवस ठेवण्यात आले. अशा या खोलीत ते असताना त्यांना पकडणारा इंग्रज अधिकारी कॅप्टन मॉकिनटॉस दररोज त्यांची माहिती घेत होता. त्यानेच उमाजीराजेंची सर्व हकीकत लिहून ठेवली आहे. उमाजीराजेंवर देशद्रोहाचा खटला चालवण्यात आला आणि या नरवीरांना न्यायाधीश जेम्स टेलर यांनी दोषी ठरवून फाशीची शिक्षा सुनावली.

देशासाठी बलिदान देणारे पहिले नरवीर उमाजीराजे नाईक दि.३ फेब्रुवारी १८३२ला पुण्याच्या खडकमाळ आळी येथील मामलेदार कचेरीत वयाच्या ४३व्या वर्षी हसत हसत फासावर चढले. जीवंतपणी सतत ताठ राहिलेली मान जीव गेल्यानंतरच वाकली. इतरांना दहशत बसावी म्हणून त्यांचे प्रेत कचेरीच्या बाहेर पिंपळाच्या झाडाला तीन दिवस लटकवून ठेवले होते. उमाजीराजेंसोबत इंग्रजांनी त्यांचे साथीदार खुशाबा नाईक आणि बापू सोळस्कर यांनाही फाशी दिली.

!! त्यांच्या अचाट देशभक्तीपर स्मृतींना संपूर्ण सप्ताहभर मानाचा लवून मुजरा !!



- संकलन व शब्दांकन -
श्री एन. के. कुमार
जी. से.नि.अध्यापक.
गडचिरोली मोबा-
७७७५०४१०८६.

## अनर्थ टळत का नाहीत?

भारतीय अर्थव्यवस्थेवर पुन्हा एकदा नरमाईचे मळभ आले आहे, असे दिसते. देशातील बँकांची नफ्याची कामगिरी सध्या वळणबिंदूवर असून २०२५-२६ मध्ये त्यांच्या नफ्याचे प्रमाण मंदावेल. वाढत्या थकीत कर्जांमुळे त्यांचे उत्पन्नही घटेल, असा अंदाज 'इंडिया रेटिंग्ज' या संस्थेने आपल्या अहवालात व्यक्त केला आहे. गेल्या डिसेंबरमध्ये जीएसटीच्या संकलनातही उतरण आली. कृषी, वनसंपत्ती, व्यवसाय, मासेमारी या क्षेत्रांचा विकास ४.७ टक्के गतीने होण्याची अपेक्षा होती. तो एक टक्क्याने घसरून ३.८ टक्के इतकाच होईल, असा ताजा अंदाज आहे. उद्योगक्षेत्राचा विकासदर ९.५ टक्के अपेक्षित होता, तो प्रत्यक्षात ६.१० टक्के इतकाच असणार आहे. सेवाक्षेत्राची वाढदेखील अपेक्षित अशी नाही. भारताची चौफेर प्रगती सुरू असून देशात जणू सुवर्णयुग आले आहे, असा कितीही प्रचार केला, तरी वास्तव वेगळेच आहे. मुळात सरकारचा भांडवली खर्चच अपेक्षित प्रमाणात होत नाही, असे आढळले आहे. डिसेंबर २०२४ मध्ये अमेरिकेच्या रोजगारनिर्मितीत अनपेक्षितपणे वाढ झाली आहे. त्यामुळे आता व्याजदरकपातीची गरज नसल्याने जगभरच्या बाजारात खळबळ माजली आहे. म्हणजेच यापुढे अमेरिकेतील म्युच्युअल फंड, वित्तसंस्था यांना मायदेशात गुंतवणूक केल्यास चांगला परतावा मिळू शकेल. त्यासाठी त्यांना भारतासह विकसनशील देशांमधील बाजारपेठांमध्ये भांडवल गुंतवणूक करण्याची गरज नाही. देशांतर्गत अर्थव्यवस्था वाढीचा दर मागच्या चार वर्षांतील सर्वात कमी, म्हणजे ६.४ टक्के राहील असा होरा आहे.

दरम्यान, भारतातील अनेक कंपन्यांच्या तिमाही कामगिरीने निराशा केली आहे. खनिज तेलाच्या आंतरराष्ट्रीय किमती पुन्हा वधारून ८० डॉलर प्रती बॅरल दरावर गेल्या आहेत. डॉलरच्या तुलनेत रुपया ८६ रुपयांच्या पार गेला आहे. अमेरिकेने रशियन तेलावर निर्बंध लादल्यानंतर, कच्च्या तेलाच्या किमती गेल्या तीन महिन्यांमधील विक्रम प्रस्थापित करत आहेत. अमेरिकेचे नवनिर्वाचित अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी आपल्या पहिल्या टर्ममध्ये भारताला अमेरिकन 'हार्ले डेव्हिडसन' मोटरसायकलवरील शुल्क हटवण्यास सांगितले होते. भारतात आयात होणाऱ्या अमेरिकन मालावर अवाजवी शुल्क लादले जाते, ही ट्रम्प यांची तक्रार आहे. भारत आणि अमेरिका यांच्यात २०० अब्ज डॉलर्सचा व्यापार होतो. ट्रम्प यांनी अमेरिकेत आयात होणाऱ्या भारतीय मालावर अतिरिक्त कर लादल्यास, मोठे नुकसान होऊ शकते. त्याच वेळी खनिज तेलाचे दर भडकल्यामुळे त्याच्या आयातीसाठी आपल्याकडे डॉलरची मागणी वाढली आहे. आयातीसाठी जादा डॉलर मोजावे लागल्यामुळे व्यापारतूट फुगणार आहे. देशाच्या सकल राष्ट्रीय उत्पादनाच्या तुलनेत चालू खात्यावरील तूट विक्रमी अशा तीन टक्क्यांपर्यंत जाण्याची भीती आहे. भारत गरजेच्या ८५ टक्के तेलाची आयात करतो. आयातीवरील खर्च जेवढा वाढतो, तेवढा विदेशी गंगाजळीवरील ताणही वाढतो.

आंतरराष्ट्रीय नाणेनिधीमधील भारताचा चलनसाठाही ४२ दशलक्ष डॉलरने घसरून, पाच अब्ज डॉलर इतकाच आहे. देशाच्या विकासात परकीय चलनाचे अनन्यसाधारण महत्त्व असते. देशात परकीय चलन किती आहे, यावरूनच रिझर्व्ह बँकेचे चलनविषयक धोरण ठरत असते. आपल्याकडे परकीय चलनाचा साठा जेवढ्या प्रमाणात असेल, तेवढ्या अधिक प्रमाणात रुपया इतर चलनांच्या तुलनेत मजबूत होतो. परकीय चलनाच्या साठ्यात घट झाल्यास रुपयाच्या मूल्यातदेखील घट होते. आपल्याकडे मोठ्या प्रमाणात विदेशी चलन असेल तर विदेशातून कोणतीही वस्तू आयात करताना समस्या उद्भवत नाहीत. विदेशी गंगाजळीची घागर भरलेली असेल, तर रुपया मजबूत होऊन महागाईही नियंत्रणात राहते. १९९०-९१ मध्ये आठवडाभर पुरेल इतके विदेशी चलनही आपल्याकडे नव्हते. १९५७-५८ मध्येही भारतापुढे परकीय चलनाचे संकट निर्माण झाले होते; पण १९९१ मध्ये त्याची परिणती देशाच्या आर्थिक व्यवस्थापनाचाच बोजवारा उडण्यात होऊ लागली होती. नरसिंह राव सरकारमध्ये अर्थमंत्री झाले, तेव्हा डॉ. सिंग यांचे विनिमय दर नियंत्रणात आणण्यास प्रथम प्राधान्य होते. रुपया खूपच भडकला होता आणि तो खाली आणणे आवश्यक होते. रुपयाचे अवमूल्यन करणे ही तेव्हा तरी भारतात राजकीय समस्या असे. कारण त्यामुळे लगेच 'देश परकीय शक्तींना विकला गेला आहे' अशी ओरड व्हायची. त्या वेळी राव सरकारकडे बहुमत नव्हते. सरकारने विश्वासदर्शक ठरावही मंजूर करून घेतला नव्हता. पण तोपर्यंत थांबता येणार नाही, असे डॉ. मनमोहनसिंग यांनी पंतप्रधान राव यांना सांगितले.

या वळणावर राष्ट्रपतींचा व मंत्रिमंडळाचा विरोध असूनही अधिकृत घोषणा न करता त्यांनी रुपयाचे २५ टक्क्यांनी अवमूल्यन करण्याचा धाडसी निर्णय घेतला. आपला पहिला अर्थसंकल्प राजीव गांधी यांच्या प्रेरक स्मृतींना अर्पण करत डॉ. सिंग म्हणाले होते, 'अतिशय कठीण अशा सरत्या वर्षाने देशापुढे प्रचंड आव्हाने उभी करून काही धाडसी पावले उचलण्याची गरज स्पष्टपणे दाखवून दिली आहे.

## दिव्यांगासाठीच्या सोयी सुविधांची चाचपणी सुगम्य यात्रा समितीकडून

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

खुलताबाद-तालुक्यातील विविध शासकीय कार्यालयांसह, महत्वाच्या धार्मिक स्थळांवर दिव्यांगासाठी काय सोई सुविधा आहेत, याची पाहणी करण्यासाठी शुक्रवारी (ता. सात) सुगम्य यात्रा समितीने विविध ठिकाणी भेटी दिल्या. तालुक्यातील पंचायत समिती, स्टेट बँक ऑफ इंडिया ची शाखा तसेच वेरुळ येथील घृष्णेश्वर मंदिर, तसेच भद्रा मारोती मंदिर परिसरास या समितीने भेट देवुन, दिव्यांगासाठी लागणारे रॅम्प तसेच शौचालय, पिण्याच्या पाण्याची सुविधा आदी तात्काळ करुन घेण्याबाबत सर्वांना सुचित केले.

या समितीमध्ये जिल्हा समाज कल्याण अधिकारी (जि.प.) साहेबराव चव्हाण, सहाय्यक प्राध्यापक सी.आर.सी.च्या अर्पणा भालेराव, सहाय्यक




लेखाधिकारी व्ही.व्ही. मामोलवाड, समाज कल्याण निरीक्षक के. जे. सोनकांबळे, जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र प्रतिनिधी देविदास कान्हेकर, ऋषिकेश सरगर, प्रहार संघटना जिल्हाध्यक्ष शिवाजी गाडे, प्रहार संघटनाचे तालुकाध्यक्ष शेख युसुफ.प्रकल्प संचालक मधुकर सुर्यवंशी,राजु देहाडे, कनिष्ठ लिपीक स्वप्निल घोडके यांचा समावेश होता. या सर्वांचे पंचायत समिती प्रशासनाच्या वतीने गट विकास अधिकारी प्रकाश नाईक यांनी स्वागत केले.

## बदलापूरमध्ये चाललंय काय? शिक्षकाला विनयभंगाच्या आरोपाखाली अटक

**ठाणे (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

बदलापूरमधील बलात्कार आणि अक्षय शिंदे एन्काउंटर प्रकरण चर्चेत असतानाच आता आणखी एका शालेय विद्यार्थिनीवर लैंगिक अत्याचाराच्या (चेश्ष्टींगिंलेप) घटनेने खळबळ उडाली आहे.

बदलापूर येथील एका खासगी इंग्रजी शाळेत १४ वर्षीय मुलीची छेडछाड केल्याच्या आरोपाखाली पोलिसांनी ४२ वर्षीय शिक्षकाला अटक केली आहे.

बदलापूर पश्चिम पोलिसांना दिलेल्या जबाबात म्हटल्याप्रमाणे, पीडित मुलगी ही इयत्ता नववीत शिकत आहे. या विद्यार्थिनीने जबाबात म्हटले आहे की, गेल्या काही दिवसांपासून शिक्षक तिची छेडछाड करत होता आणि अनावश्यक गप्पा मारत होता.

गुरुवारी सकाळी मात्र त्याने तिला अनुचित प्रकारे स्पर्श करण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर मुलीने घरी जाऊन तिच्या पालकांना सर्व काही सांगितले. पालकांनी ताबडतोब स्थानिक पोलीस ठाण्यात संपर्क साधला. त्यानंतर पोलिसांनी तातडीने शिक्षकाविरुद्ध पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल केला आणि आरोपीला त्याच्या घरातून अटक केली.

गेल्या वर्षी ऑगस्टमध्ये, दुसऱ्या एका खाजगी शाळेतील ४ वर्षीय दोन अल्पवयीन मुलींवर तिथे काम करणाऱ्या सफाई कामगाराने लैंगिक अत्याचार केले होते. ज्यामुळे देशभरात मोठ्या प्रमाणात निदर्शने झाली होती. आरोपी अक्षय शिंदेचा नंतर कथित पोलीस चकमकीत मृत्यू झाला. तर कालच तामिळनाडूच्या कृष्णागिरीमधील बारगुर येथील शाळेच्या आवारात १३ वर्षीय विद्यार्थिनीवर ३ शिक्षकांनी लैंगिक अत्याचार केल्याची घटना उघडकीस आली आहे.

# माघी यात्रेकरिता पंढरपूरात अडीच लाखाहून अधिक भाविकांची मांदियाळी



पंढरपूर : माघी यात्रेच्या सोहळ्याकरिता अडीच लाखाहून अधिक भाविकांचे पंढरीत आगमन झाले आहे. माघी दशमी दिवशी शुक्रवारी (ता. ७) पहाटेपासूनच चंद्रभागा नदीस्नानाची पर्वणी साधण्यासाठी नदीकिनारी लाखो भाविकांची गर्दी झाली होती. शुक्रवारी श्री विठ्ठलाच्या दर्शनाची रांग सात नंबरच्या पत्रा शेड पर्यंत गेली असून श्रींच्या दर्शना साठी १६ ते १८ तासांचा अवधी लागत आहे. माघी यात्रेच्या सोहळ्यात सहभागी होण्यासाठी महाराष्ट्र राज्यासह शेजारील तेलंगणा व कर्नाटक राज्यातून लाखो भाविक पंढरीत दाखल झाले आहेत. भाविकांच्या गर्दीने ६५ एकर, चंद्रभागा नदीचे वाळवंट, श्री विठ्ठल मंदिर परिसर, प्रदक्षिणा मार्ग फुलून गेला आहे.

दरम्यान शुक्रवारी दशमी दिवशी पहाटेपासूनच लाखो भाविकांनी चंद्रभागा नदीमध्ये स्नान करण्यासाठी गर्दी केली होती. नदीस्नानानंतर भाविक श्री विठ्ठल पददर्शनासाठी गोपाळपूर रस्त्यालगतच्या पत्रा शेडमधील दर्शन रांगेत उभे राहत होते. दर्शनाची रांग सात नंबर पत्रा शेडच्या पुढे गेली होती. पत्रा शेड दर्शन रांगेतील हजारो भाविकांसाठी श्री विठ्ठल मंदिर समितीने दर्शन रांग परिसरामध्ये अन्नछत्र सुरू केले आहे. समितीच्या वतीने नवमी व दशमी दिवशी भाविकांना तांदळाच्या खिचडीचे वाटप करण्यात आले तर एकादशी दिवशी साबुदाणा खिचडीचे व चहाचे वाटप करण्यात येणार आहे. दरम्यान शुक्रवारी श्री विठ्ठल दर्शन घेऊन मंदिरा बाहेर आलेले गजानन दत्तोबा कालिंग (रा. हलगा, ता. बेळगाव, जि. बेळगाव) बोलताना म्हणाले, गुरुवारी (ता.६) सायंकाळी सहा वाजता सात नंबरच्या पत्रा शेड दर्शन रांगेत होतो; सुमारे १८ तासांनी शुक्रवारी दुपारी बारा वाजता श्री विठ्ठलाचे दर्शन प्राप्त झाले.

चंद्रभागा नदीच्या पैल तीरावरील भक्ति सागर (६५ एकर) मधील ४९७ प्लॉट्स पैकी ४४८ प्लॉटचे बुकिंग झाले आहे. त्या परिसरात दिंडीकरांनी उभारलेल्या तंबू व राहूट्या मध्ये सुमारे दीड लाखाहून अधिक भाविक मुक्कामी आहेत. या भाविकांना सोई सुविधा पुरवण्यासाठी तेथे एक आपत्कालीन मदत केंद्र उभारण्यात आले आहे. माघ एकादशीचा मुख्य सोहळा शनिवारी (ता.८) असून सुमारे अडीच लाखाहून अधिक भाविक पंढरीत दाखल झाले आहेत.

या भाविकांसाठी गोपाळपूर पत्रा शेड पदस्पर्शदर्शनरांगेत ६ पत्राशेड उभारण्यात आले होते.

मात्र, दर्शनरांगेतील भाविकांची गर्दी वाढली असल्याने येणाऱ्या भाविकांची गैरसोय होऊ नये तसेच दर्शनरांग सुलभ व जलद गतीने चालविण्यासाठी यंदा प्रथमच अतिरिक्त २ तात्पुरत्या पत्राशेड नव्याने उभारण्यात आल्याची माहिती श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी दिली.

## आप्पासाहेब धोत्रे यांचा वाढदिवस मोठ्या उत्साहात साजरा



**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

७/२/२०२५ रोजी आप्पासाहेब धोत्रे यांचा वाढदिवस मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला. यावेळी वर्ग मित्र रामनाथ पोटे, चंद्रकांत सोनवणे ,विठ्ठल कहाटे, सुनिल शिंदे ,दत्ता धोत्रे , श्लोक धोत्रे ,दिपक धोत्रे ,माऊली धोत्रे, किशोर धोत्रे , दत्तु राऊत, बद्री चव्हाण,दिनेश धोत्रे , रामकृष्ण धोत्रे, अशोक धोत्रे , दत्तू सुराशे, नंदु पाटील धोत्र, तसेच नातेवाईक अनिल पाटील चव्हाण ,हरिभाऊ नवाले, किरण नवले, बाबासाहेब जगताप, शरद त्रिभुवन, नवनाथ पवार, दादासाहेब शिंदे, ग्यानेश्वर शिंदे तसेच सर्व वर्ग मित्र, सरपंच, उपसरपंच काटेपिंपळगाव ता. गंगापुर , जि. छ.संभाजीनगर असे सर्वांनी मला वाढदिवसाच्या खूप खूप शुभेच्छा दिल्या , त्याबद्दल सर्वांचे मनापासून खूप खूप धन्यवाद ..

## पहिल्या वनडेत भारताचा इंग्लंडवर सहज विजय

**नागपूर :** भारत आणि इंग्लंड यांच्यातील पहिल्या वनडे सामन्यात भारताने सहज विजय मिळवला आहे. शुभमन गिल, श्रेयस अय्यर आणि अक्षर पटेल यांनी झळकावलेल्या अर्धशतकांच्या जोरावर भारताने विजयासाठी मिळालेले २४९ धावांचे आव्हान ४ विकेट आणि ६८ बॉल राखत पूर्ण केले.

भारताच्या या विजयात गोलंदाज आणि फलंदाज या दोघांनी महत्त्वाची भागीदारी केली. आधी गोलंदाजांनी टिच्चून मारा करताना इंग्लंडला मोठी धावसंख्या उभारू दिली नाही. हर्षित राणा आणि रवींद्र जडेजा या जोडीने प्रत्येकी तीन विकेट घेत इंग्लंडच्या डावाला खिंडार पाडले. त्यांनी इंग्लंडला २४८ धावांवर रोखले.

## जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत आदर्श विद्यार्थी पुरस्काराचे वितरण

### भद्रसाई कृषी उद्योगचा अभिनव उपक्रम

**खुलताबाद (अट्टल संकेत प्रतिनिधी)**



तालुक्यातील पळसवाडी गावात जिल्हा परिषद प्राथमिक शाळेमध्ये भद्रसाई कृषी उद्योग च्या वतीने आदर्श विद्यार्थी पुरस्काराचे वितरण करण्यात आले.

जिल्हा परिषद प्रशाला प्राथमिक शाळेतून वर्ग सातवीतुन प्रांजल परमेश्वर पगारे व रोहित दिपक थोरात तसेच नाथ माध्यमिक शाळेतून वर्ग दहावीतुन श्रावणी विजय औटे व वर्ग नववीतुन धिरज हरीभाऊ गायकवाड या विद्यार्थ्यांची आदर्श पुरस्कारासाठी निवड करण्यात आली.व त्यांना स्मृतिचिन्ह, प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला. निवड प्रक्रियेत मच्छिंद्र ठेंगडे, चांदणे सर जगताप सर काळे सर, ज्योती शिंदे अनुराधा कांबळे,सविता निकाळजे, नागे, हरणे, अहिरे, व प्रियंका सोनवणे या शिक्षकांनी परिश्रम घेऊन कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मोलाचे सहकार्य लाभले

शाळेत दररोज येणे, शिस्तबद्ध असणे, शिक्षकांनी दिलेला अभ्यासक्रम वेळेत पुर्ण करणे, शिक्षकांच्या आज्ञात असणे, आई-वडिलांचे आदर करणे व अभ्यासात सातत्य ठेवत आपण स्वतः ठरवलेला गोल सफल करण्यासाठी मेहनत, चिकाटीने विद्यार्थी यशस्वी होतो. तोच विद्यार्थी आदर्श विद्यार्थी पुरस्कारांचा मानकरी ठरतो असे किशोर जाधव यांनी याप्रसंगी सांगितले. कार्यक्रम ासाठी सरपंच दगडु भेंडे, उपसरपंच सोमिनाथ ठेंगडे, रमेश ठेंगडे, शुभम बरडे, महेश दहिवाळ, गावांतील लोक व महिला पालकवर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पालकांनी मुलांना मोबाईल पासून दूर ठेवून वाचनाची आवड लागेल यासाठी प्रयत्नशील असावे. मुलांना सोशल मीडियापासून दूर ठेवावे. मुलांच्या हातात मोबाईल ऐवजी पुस्तके थांबवली तरच आदर्श विद्यार्थी घडतील.

**– ज्ञानेश्वर जाधव.**
संचालक भद्रसाई कृषी उद्योग.

## उद्धव गट आणखी फुटणार, ऑपरेशन टायगर जोरात

मुंबई : उद्धव ठाकरे गट आणि महाविकास आघाडीत आणखी मोठी फूट पडेल. पुढील ९० दिवसांत टप्प्याटप्प्याने १० - १२ आमदार उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील शिवसेनेत प्रवेश करतील, असे राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत म्हणाले. लवकरच उद्धव ठाकरे गटाचे लोकसभेतील किमान सहा खासदार शिवसेनेत प्रवेश करतील, अशीही चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे.



महाराष्ट्रातून उद्धव ठाकरे गटाचे नऊ खासदार लोकसभेवर आणि २० आम दार विधानसभेवर निवडून गेले आहेत. यामुळे उद्धव गटाचे लोकसभेतील किम ान सहा खासदार आणि विधानसभेतील किमान १४ आमदार एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील शिवसेनेत प्रवेश करत असल्यास त्यांच्या विरोधात पक्षांतर बंदी कायद्यांतर्गत कारवाई करता येणार नाही, असे तज्ज्ञांचे मत आहे. जर लोकप्रतिनिधी टप्प्याटप्प्याने प्रवेश करणार असतील तर त्यांना राजीनामा देऊन आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील शिवसेनेच्या तिकिटावर पोटनिवडणुकीद्वारे पुन्हा निवडून येऊन स्वतःची स्थिती मजबूत करता येईल. या दोन पैकी कोणताही पर्याय वापरुन लोकप्रतिनिधींनी उद्धव ठाकरे गटातून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला तर तो म विआसाठी घातक ठरणार आहे. राज्यात मविआचे मर्यादीत संख्याबळ आहे. यामुळे उद्धव गट फुटल्यास राज्यातील मविआ आणि राष्ट्रीय राजकारणात काँग्रेसच्या नेतृत्वातील इंडी आघाडी कमकुवत होण्याचा आणि उद्धव ठाकरे यांच्या राजकीय अस्तित्वापुढे प्रश्न निर्माण होण्याचाही धोका आहे. संसदेत वक्फ बोर्ड विधेयक, समान नागरी कायदा, एक देश - एक निवडणूक कायदा असे कायदे मंजुरीसाठी सादर होतील त्यावेळी विरोधकांची ताकद एकदम क्षीण झाली असल्यास त्याचा फायदा सत्ताधा[illegible]यांना होणार आहे. यामुळे उद्धव गटात काय घडते याकडे अनेकांचे लक्ष आहे.

**उद्धव ठाकरे गटाचे लोकसभेतील खासदार**

अरविंद सावंत, दक्षिण मुंबई
संजय देशमुख, यवतमाळ - वाशिम
नागेश पाटील - आष्टीकर - हिंगोली
संजय जाधव - परभणी
राजाभाऊ वाजे - नाशिक
संजय दिना पाटील - ईशान्य मुंबई
भाऊसाहेब वाकचौरे - शिर्डी
अनिल देसाई - दक्षिण मध्य मुंबई
ओमप्रकाश राजेनिंबाळकर - धाराशिव (उस्मानाबाद)

## भारतीय दलीत पँथरच्या वतीने माता रमाई आंबेडकर यांची १२७ वी जयंती निमित्त महिलांचा सन्मान सत्कार



**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

भारतीय दलीत पँथर च्या वतीने माता रमाई आंबेडकर यांची १२७ वी जयंती निमित्त महिलांचा सन्मान सत्कार करण्यात आला. डॉ.आंबेडकर नगर येथील डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्ण कृती पुतळ्यास व माता रमाई आंबेडकर यांच्या प्रतिमेस दीप धुपाणी पूजन करून पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

यावेळी पँथर नेते लक्ष्मण भूतकर निवृत्ती घोरपडे यांनी माता रमाई यांचे जीवनावर भाषण केले महिलांनी माता रमाई आंबेडकर यांचे विचार आत्मसात करावे असे आवाहन करून महिलांचा सन्मान सत्कार केला.

यावेळी लक्ष्मण भुतकर दशरथ कांबळे संजय सरोदे समाधान कस्तुरे प्रकाश पवार दिलीप पवार रामदास पगडे धर्मा गवई राजेंद्र नवतुरे गणेश अंभोरे महिला आघाडीचे सौ गीताबाई मस्के शुभाद्रा बाई पार्वती बाई घोरपडे कलावती गवई प्रयाग बाई इंगळे सह मोठे संख्येने कार्यकर्ते सहभागी होते.

## अशोक नगर मसनतपुर येथे अवैध देशी दारू विक्री; कारवाईची मागणी

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी**

शहरातील अशोक नगर मसनतपुर वार्ड क्रमांक ३८ येथे कंपनी कामगार आणि बांधकाम मजुरांच्या वस्तीत ४ ते ५ ठिकाणी अवैध देशी दारू विक्री सुरू असून, त्यामुळे स्थानिक नागरिकांना मोठ्या समस्यांना सामोरे जावे लागत आहे. या दारू विक्रीमुळे अनेक तरुण व्यसनाधीन होऊन मृत्युमुखी पडले असून, अनेकांचे संसार उद्ध्वस्त झाले आहेत.

स्थानिक नागरिकांच्या वतीने श्रीरंग पांडुरंग ससाणे, संस्थापक अध्यक्ष, यांनी यासंदर्भात आवाज उठवला आहे. त्यांनी दिनांक २ जानेवारी २०२५ रोजी राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधिकारी संतोष झगडे आणि एम. सिडको पोलिस ठाण्याचे निरीक्षक यांना निवेदन देऊन कारवाईची मागणी केली होती. मात्र, अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही. स्थानिक नागरिकांनी या अवैध दारू विक्रीमुळे परिसरात कायदा-सुव्यवस्थेचा मोठा प्रश्न निर्माण झाला असल्याचे सांगितले. दारूच्या नशेत लोक रस्त्यावर गोंधळ घालतात, म हिलांवर अश्लील टिप्पणी करतात आणि विद्यार्थ्यांना त्रास सहन करावा लागतो. तसेच, मनपा शाळेच्या परिसरातही या व्यसनाधीन लोकांचा वावर असल्याने शालेय मुलांच्या सुरक्षिततेवरही प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे.

## यशोदाबेन मोदी यांनी घेतले घृष्णेश्वराचे दर्शन

**खुलताबाद (अट्टल संकेत प्रतिनिधी)**



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पत्नी यशोदाबेन यांनी घेतले बारावे ज्योतिर्लिंग श्री घृष्णेश्वर मंदिराचे दर्शन घेतले. शुक्रवारी दुपारी बारा वाजेच्या सम ारास खुलताबाद तालुक्यातील वेरूळ येथे येऊन बारावे ज्योतिर्लिंग श्री घृष्णेश्वर सहपरिवार मंदिराचे दर्शन घेतले. यशोदाबेन मोदी यांचा खुलताबाद दौरा,धार्मिक स्थळांना भेटी देत देवदर्शन.

पंतप्रधान मोदी यांच्या निकटवर्तीय यशोदाबेन मोदी यांनी शुक्रवारी (दि. ७) खुलताबाद तालुक्याच्या दौरा करीत विविध धार्मिक स्थळांना भेटी देत देवदर्शन केले. कुटुंबियसमवेत आलेल्या यशोदाबेन यांनी प्रथम खुलताबाद तालुक्यातील वेरुळ येथील १२ वे ज्योतिर्लिंग श्री. घृष्णेश्वराचे दर्शन घेवुन अभिषेक त्यानंतर त्यांचा घृष्णेश्वर विश्वस्त समितीतर्फे सत्कार केला. यानंतर यशोदा बेन व कुटुंबिय यांनी खुलताबाद येथील भद्रा म ारोती,म्हैसमाळ येथील गिरजा देवी,बालाजी मंदिरास भेट देत देवदर्शन केले.

यावेळी तहसीलदार स्वरुप कंकाळ,यांच्या मार्गदर्शनाखाली चोख दर्शन व्यवस्था ठेवण्यात आली होती. यावेळी कोणतेही अडीअडचणी येऊ नाही म्हणून खबरदारी घेत पोलीस निरीक्षक धनंजय फराटे यांचे मार्गदर्शनाखाली चोक पोलीस बंदोबस्त लावण्यात आले होते सहाय्यक पोलीस निरीक्षक दिनेश गोरे. सहाय्यक पोलीस निरीक्षक पी.टी. बनसोड. महिला पोलीस कॉन्स्टेबल सोनाली कुंदे. जयश्री बागुल. यावेळी यांनी चौक बंदोबस ठेवले होते.

## प्रयागराज कुंभमेळ्यात जगद्गुरू उपाधी पट्टा अभिषेक सोहळा संपन्न झाल्यानंतर

# धार्मिक, अध्यात्मिक व सामाजिक क्षेत्रातून जगद्गुरू महामंडलेश्वर स्वामी शांतिगिरीजी महाराजांचे प्रथम पूजन, स्वागत छत्रपती संभाजीनगरात

**दिनेश परदेशी/छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत विशेष प्रतिनिधी)**

जगद्गुरू उपाधी पट्टा अभिषेक सोहळा संपन्न झाल्यानंतर श्री. श्री. १००८ महामंडलेश्वर स्वामी शांतिगिरीजी महाराज यांचे ६ फेब्रुवारी रोजी प्रथमच संभाजीनगर शहरात आगमन झाले. चिकलठाण विमानतळावर जय बाबाजी भक्त परिवाराच्या वतीने भव्य स्वागत करण्यात आले त्यानंतर रामनगर, मुकुंदवाडी, चिकलठाणा येथील सर्व भाविकांनी स्वागताचे आयोजन केले होते त्यांचे स्वागत स्वीकारित क्रांती चौक येथे छत्रपती शिवरायांना जगतगुरु स्वामी शांतिगिरी जी महाराज यांनी अभिवादन केले त्यानंतर भव्य पूजन व स्वागत स्थळी संत एकनाथ रंगमंदिर मंदिर येथे आगमन झाले या व्यासपीठावर धार्मिक, अध्यात्मिक व सामाजिक क्षेत्रातून महामंडलेश्वर स्वामी शांतीगिरीजी महाराजांचे पूजन करण्यात आले.

जय बाबाजी भक्त परिवारातील छत्रपती संभाजीनगर शहरासह ग्रामीण भागातील वैजापूर,गंगापूर,कन्नड, पैठण, रत्नपुर, फुलंब्री व पैठण तालुक्यातील भाविक भक्तांसह जळगाव, धुळे आणि नाशिक येथील पदाधिकाऱ्यांनी बाबाजींचे पूजन केले. या मान्यवरांसह उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे तथा पालकमंत्री संजय शिरसाट यांचे प्रतिनिधी म्हणून शिवसेना संभाजीनगर जिल्हाप्रमुख राजेंद्र जंजाळ यांनी बाबाजींचे पूजन करत शुभ आशीर्वाद घेतले.

मराठवाड्यातील प्रसिद्ध गायक प्राध्यापक राजेश सरकटे, ज्येष्ठ विधीतज्ञ ॲड. विलास धोरडे पाटील, वास्तु विशारद महेश साळुंखे, शिवसंग्राम संघटनेचे किशोर चव्हाण, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे मच्छिंद्र देवकर पाटील, झुंजार छावा संघटनेचे सुनील कोटकर पाटील, साकला नर्सरीचे संचालक सुरेश शेठ साकला व जागृत हनुमान मंदिर बजाज नगर यांच्यासह अनेक भाविकांनी जगद्गुरु महामंडलेश्वर स्वामी शांतिगिरी महाराज यांचे पूजन केले.

जगद्गुरू या उपाधीचे हिंदू धर्म आणि अध्यात्मिक जीवन प्रणालीत एक आगळे - वेगळे महत्व आहे. हिंदू धर्माचा विचार प्रचार आणि प्रसार करणाऱ्या अनेक महान संत महंत यांनी या उपाधीला अन्याय साधारण महत्व मिळवून दिले आहे. संत तुकाराम महाराज सारखे संतश्रेष्ठ यांना हा बहुमान वारकरी संप्रदाय आणि वारकऱ्यांनी दिला आहे. अशी हिंदू धर्माची महान परंपरा आणि संतश्रेष्ठ महाराजांच्या नावाने पावन झालेल्या या उपाधीची मानमर्यादा व प्रतिष्ठा जपण्याची ही उपाधी मिळाल्यामुळे मोठी जबाबदारी खांद्यावर आली आहे.



संतमहंत यांच्या सस्नेह सहवासातून आणि भाविक भक्तांच्या प्रेमळ भक्तीच्या सानिध्यात ही जबाबदारी पूर्ण विनम्र भावाने पार पाडेल, अशी भावूक उद्गार महामंडलेश्वर स्वामी शांतीगिरीजी महाराज यांनी यावेळी काढले.

महाराष्ट्रातील संत परंपरेतील थोर संत जगद्गुरु जनार्दन स्वामी (मौनगिरीजी) महाराज श्रीक्षेत्र वेरूळ, तालुका रत्नपुर, जिल्हा छत्रपती संभाजीनगर यांचे उत्तराधिकारी म्हणून श्री. श्री. १००८ महामंडलेश्वर स्वामी शांतिगिरीजी महाराज यांनी हिंदू धर्माची जप, तप, अनुष्ठान ,श्रमदान ,गोसेवा, गुरुकुल, श्रमदान या परंपरा अतिशय श्रद्धापूर्वक जपल्या आहे. प्राचीन भारतीय संस्कृतीच्या प्रचार प्रसारासाठी महाराष्ट्र व महाराष्ट्राच्या बाहेर जवळपास १०८ आश्रमाची निर्मिती त्यांनी केली आहे. त्यांच्या या कार्याची विशेष दखल घेऊन श्री. शंभू जुना पंचदशनाम आखाड्याने जगद्गुरु या पदवीने त्यांचा सन्मान केला असल्याने अत्यंत आनंद झाल्याची, भावना स्वामी जनेश्वरानंद महाराज यांनी व्यक्त केली.

श्री. श्री. १००८ महामंडलेश्वर स्वामी शांतिगिरीजी महाराज यांच्या संभाजीनगरसह राज्यभरातील हिंदू धर्मासाठी व आध्यात्मिक क्षेत्रात केलेल्या कामकाजाची प्रशंसा करत जिल्ह्यातील विविध सामाजिक प्रश्नांवर घेतलेल्या भूमिकांचा व समाज कल्याणासाठी केलेल्या प्रयत्नांचा ॲड. विलास धोरडे पाटील, प्राध्यापक राजेश सरकटे व जिल्हाप्रमुख यांनी बाबाजींचे आभार मानले. तसेच, संतश्रेष्ठ महान उपाधी मिळाल्याबद्दल सत्कार करत शुभेच्छा दिल्या.

श्री. शंभू पंचदशनाम जुना अखाडा सर्व गुरुमुर्तींच्या प्रेरणेने व अखिल भारतीय आखाडा परिषदेचे महामंत्री श्री. महंत हरीगिरीजी महाराज यांच्या प्रमुख उपस्थितीत जुना पिठाधीश्वर आचार्य महामंडलेश्वर स्वामी अवधेशानंद गिरीजी महाराज यांच्या शुभहस्ते महाराष्ट्रातील संत परंपरेतील थोर संत जगद्गुरु जनार्दन स्वामी (मौनगिरीजी) महाराज श्रीक्षेत्र वेरूळ, तालुका रत्नपुर, जिल्हा छत्रपती संभाजीनगर यांचे उत्तराधिकारी श्री.स्वामी शांतीगिरीजी महाराज यांचा जगद्गुरु पदाचा पट्टा अभिषेक सोहळा दिनांक २ फेब्रुवारी २०२५ रोजी दुपारी ४ वाजता विशेष मुहूर्तावर संपन्न झाला असल्याची, माहिती राजेंद्र पवार यांनी दिली.

प्रयागराज येथून महाराजांचे ६ फेब्रुवारी रोजी छत्रपती संभाजीनगर विमानतळावर संध्याकाळी ६ वाजता आगमन झाले.

जय बाबाजी भक्त परिवार तथा शहरातील धार्मिक, सामाजिक संस्था यांच्या वतीने विम ानतळ ते संत एकनाथ रंग मंदिर पर्यंत असंख्य भाविकांसह ठिकठिकाणी पूजन स्वीकारत मुकुंदवाडी- सिडको बस स्टॅन्ड आकाशवाणी- मोंढा नाका क्रांती चौक मार्गे कार्यक्रम स्थळ संत एकनाथ राम मंदिर येथे आगमन झाले.

संत एकनाथ रंगमंदिर, गुरू गोविंदसिंगपुरा येथे धार्मिक, अध्यात्मिक, राजकीय अनेक मान्यवरांच्या जगद्गुरु क्षेत्रातील शुभहस्ते स्वामी शांतिगिरीजी महाराजांचे पूजन व सत्कार ६ फेबुवारी रोजी सायंकाळी ८.३० वाजता संपन्न झाले.त्यानंतर जगगुरु महामंडलेश्वर स्वामी शांतिगिरी महाराज यांचे मार्गदर्शन झाले असून आलेल्या भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. या ऐतिहासिक व महत्त्वपूर्ण प्रसंगी जय बाबाजी भक्त परिवारासह आध्यात्मिक सामाजिक राजकीय क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती होती अशी माहिती जय बाबाजी भक्त परिवाराच्या वतीने राजेंद्र पवार यांनी दिली.

### जय बाबाजी भक्त परिवारासाठी महत्त्वपूर्ण क्षण; दिवाळी सारखा साजरा – राजेंद्र पवार



महामंडलेश्वर प.पू. स्वामी शांतीगिरीजी महाराज यांना प्रयागराज कुंभमेळ्यात जगद्गुरू उपाधी मिळाल्यानंतर प्रथमच महाराष्टात आगमन होत आहे. त्यामुळे सर्व भक्तांमध्ये उत्सुकता होती की, बाबाजी पहिल्यांदा कोणत्या शहरात आपले चरण ठेवणार सर्व प्रमुखांनी आपापल्या परीने प्रयत्न केले. परंतु यात बाजी मारली ती छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याने राजें द्र पवार यांच्या मार्गदर्शनाखाली व प्रयत्नाने जगद्गुरू वंदनीय शांतीगिरी महाराजांचे प्रथम पूजन व स्वागत मोठ्या दिमाखात संत एकनाथ रंग मंदिर छत्रपती संभाजीनगर येथे पार पडले. जय बाबाजी भक्त परिवारासाठी जगद्गुरू ही उपाधी मिळाल्यानंतरचा हा उत्सव म्हणजे दिवाळीच आहे, असे राजेंद्र पवार यांनी दै. अट्टलसंकेतशी बोलताना सांगितले. तसेच या पुढील बाबाजींचे संकल्पपूर्तीकडे अजून जोमाने कार्य करू, असे ही पवार म्हणाले.

#### राजेंद्र पवार यांच्यावरही शुभेच्छांचा वर्षाव

५ फेब्रुवारी रोजी राजेंद्र पवार यांचा वाढदिवस होता. स्वत: कधी गवगवा यांनी केला नाही. याचा अट्टल संकेतच्या प्रतिनिधीस प्रत्यय आला. कारण ५ फेब्रुवारी रोजी त्यांची भेट घेतली होती. परंतु त्यांनी साधी पुष्टीही केली नव्हती. परंतु राजेश सरकटे यांनी व्यासपीठावर राजेंद्र पवार यांचा ५रोजी वाढदिवस झाला. त्यामुळे याशुभप्रसंगी त्यांनाही बाबाजींच्या हाताने पुष्पहार घालून आशीर्वाद देण्यात आले व त्यांच्यावरही शुभेच्छांचा वर्षाव करण्यात आला.

## सुरक्षेच्या दृष्टीकोनातून बोअरवेल्स संदर्भात मार्गदर्शक सुचना जारी

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

संचालक आपत्ती व्यवस्थापन प्रभाग व राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्रतिसाद दलाच्या निर्देशानुसार बोअरवेल्स संदर्भात मार्गदर्शक सुचना जारी केल्या आहेत. यासाठी वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्व्हेक्षण विभाग यांना नोडल अधिकारी म्हणून नियुक्त केल्याचे आदेश जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी दिले आहेत.

सदर आदेशात नमूद केले आहे की ,उघड्या बोअरवेल यांना अनिवार्यपणे सिल करणे, जेणेकरुन त्याठिकाणी जाण्यास मज्जाव होईल. यासाठी संबंधित जमीन मालक आणि ड्रिलिंग एजन्सी यांची जबाबदारी निश्चित करावी, सर्व बोअरवेल्स यांच्या नोंदणीची प्रणाली स्थापन करणे आवश्यक आहे. उघड्या बोअरवेल संबंधी असलेली जोखीम व लहान मुलांची सुरक्षा याबाबत व्यापक जनजागृती मोहिम राबविणे. बोअरवेल ऑपरेटर्स किंवा जमीन मालक यांनी बोअरवेलच्या सभोवताली सुरक्षेच्या अनुषंगाने अडथळे निर्माण करणे. असुरक्षित बोअरवेल ओळखण्यासाठी व त्यासंबंधी निराकरण करण्यासाठी समुदाय संचलित यंत्रणा कार्यान्वित करणे.

सर्वोच्च न्यायालय यांनी जारी केल्याप्रमाणे बोअरवेल सुरक्षा नियमांचे उल्लंघन केल्यास संबंधिताकडून कठोर दंड आकारणी करण्यात्येनार आहे. सुरक्षा नियमांचे पालन होते किंवा कसे याबाबत खात्री करण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांची नियमित तपासणी करणेआवश्यक आहे. या आदेशाची अवज्ञा झाल्यास आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ चे कलम ५१ अन्वये कोणतीही व्यक्ती संस्था, अथवा समूह यांचेवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल असे निवासी उपजिल्हाधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे विनोद खिरोळकर यांनी आदेशाद्वारे कळविले आहे.

## झाडे कापण्याच्या परवानगीसाठी महापालिका बनवणार ॲप

### झाडे कापणे आणि पुनर्रोपित करण्याच्या प्रशासकीस कामात येणार सुसूत्रता

**मुंबई (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

मुंबईतील अनेक विकासकामांमध्ये आड येणारी अनेक झाडे कापली जातात तसेच काही झाडे ही पुनर्रोपित केली जातात. ही झाडे कापण्यासाठी तसेच पुनर्रोपित करण्यासाठी वृक्ष प्राधिकरणासमोर रितसर प्रस्ताव सादर करून त्याला मंजुरी दिली जाते. त्यामुळे या झाडे कापण्यास परवानगी प्रक्रिया राबवण्यासाठी महापालिकेच्यावतीने ॲप बनवण्याचा निर्णय महापालिका प्रशासनाने घेतला आहे.

या ॲपमुळे झाडे कापणे तथा पुनरोपित करण्याच्या मंजुरीच्या प्रशासकीय कामांमधील वेळ कमी होण्यास मदत होईल आणि संबंधितांना याबाबतचा प्रस्ताव कुणाच्या टेबलापर्यंत ही फाईल आहे याची माहिती प्राप्त होईल. पण, वृक्षप्राधिकरणाच्या मंजुरीची प्रक्रिया पूर्वीप्रमाणेच राबवली जाईल, त्यात बदल होणार नाही, असे प्रशासनाने स्पष्ट केले. TREE MAY FALL BE AWARE मुंबई महापालिकेचे आयुक्त तथा प्रशासक डॉ. भूषण गगराणी यांनी आपल्या अर्थसंकल्पीय भाषणांत उद्यान खात्यासाठी ट्री रिमुअर परिमिशन ॲप विकसित करण्यात येणार असल्याचे जाहीर केले. मुंबई महापालिकेच्यावतीने इमारत बांधकाम, तसेच रस्ते, मलवाहिनी, पर्जन्य जलवाहिनी, नाल्यांचे रुंदीकरण तसेच विविध पायाभूत विकास प्रकल्पांच्या कामांमध्ये आड येणारी झाडे कापण्यासंदर्भात महापालिकेच्या उद्यान विभागाकडे परवानगीसाठी अर्ज केला जातो. त्यानुसार, महापालिकेच्या उद्यान विभागाच्यावतीने प्रत्येक झाडांची स्थळ पाहणी करून तसेच लोकांकडून हरकती व सूचना जाणून घेत झाडे कापण्यास आणि त्यातील काही झाडे कापण्याऐवजी पुनर्रोपित करण्यासाठीचा प्रस्ताव वृक्ष प्राधिकरणाला सादर केला जातो. त्यामुळे प्रत्यक्षात वृक्षप्राधिकरणाला प्रस्ताव सादर होईपर्यंत प्रशासकीय कार्यपध्दतीवर वेळ जातो, याची माहिती संबंधितांना व्हावी यासाठी महापालिकेच्यावतीने ॲप विकसित केले जाणार आहे. या ॲपच्या माध्यमातून संबंधितांना प्रत्यक्षात झाडे कापण्यास परवानगीसाठी अर्ज केल्यानंतर त्याची पुढील प्रक्रिया या ॲपच्या माध्यमातून जाणून घेता येणार आहे. या ॲपच्या माध्यमातून परवानगीपासून ते वृक्ष प्राधिकरणाकडे मंजुरीसाठी प्रस्ताव पाठवेपर्यंत जो प्रवास असेल त्याची माहिती मिळू शकेल. त्यामुळे हे ॲप विकसित केल्यानंतर विकासकामांमध्ये वृक्ष कापण्यासाठी जी परवानगी मागितली जाणार आहे, त्याची माहिती मिळणार असून एकप्रकारे या कार्यपध्दतीत सुसुत्रता आणण्याचा प्रयत्न केला जाणार असल्याचे आयुक्तांनी स्पष्ट केले.

## गतिमान प्रशासनासाठी ‘ई’ ऑफिस प्रणालीची प्रभावी अंमलबजावणी- जिल्हाधिकारी दिलीप स्वामी

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

शासनाच्या सप्तसुत्री कार्यक्रमाअंतर्गत शासकीय सुविधा लोकाभिमूख आणि सहज उपलब्ध व्हाव्यात यासाठी माहिती तंत्रज्ञान विभागा मार्फत ‘ई’- ऑफिस प्रणाली वापरात आणली आहे. छत्रपती संभाजीनगर जिल्हाधिकारी कार्यालयात ‘ई’ - ऑफिस प्रणाली प्रभावीपणे कार्यन्वित करण्यात आली असून, त्याचा व्यापक वापर सुरु आहे. कार्यालयीन कामकाज अधिक वेगवान आणि पारदर्शक करण्याच्या उद्देशाने संगणक , स्कॅनर यासारखी साधने वापर करुन प्रणाली कार्यन्वित करण्यात आली आहे. ‘ई’ - ऑफिसद्वारे सर्व फाईल्स निर्गमित करण्यात येत आहेत. यामुळे कागदपत्रांचे डिजिटल स्वरुपात रुपांतर वेगाने होत आहे. सर्व उपविभागीय व तहसिल कार्यालयांतील कर्मचाऱ्यांना आवश्यक प्रशिक्षण देण्यात आले आहे. याचा परिणाम म्हणून ई फाईल्स आणि ‘ई’ - पावत्या मोठ्या प्रमाणात तयार होत आहेत. मागील दोन महिन्यांत २३०० फाईलीचे संग्रहण आणि पाठपुरावा घेणे सोपे झाले आहे. कामकाजात पारदर्शकता आणि जबाबदारी वाढली आहे. यामुळे अधिकाऱ्यांना तत्पर निर्णय घेण्यास मदत होत आहे.

‘ई’ - ऑफिसचा जास्तीत जास्त वापर करण्यावर भर देण्यात येणार असून लवकरच संपूर्ण प्रशासकीय प्रक्रिया डिजिटल करण्याच्या दिशेने वाटचाल केली जाणार आहे. असे जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी सांगितले.

हे वृत्तपत्र मालक, मुद्रक , प्रकाशक - श्री. **रशपालसिंग निरंजनसिंग अट्टल** यांनी मानसी प्रिंटर्स, प्लॉट नं. ४ ५ ए , सर्व्हिस इंडस्ट्री सेक्टर , सिडको, औरंगाबाद (महा.) - ४ ३ १ ० ० ५ येथे छापून शॉप नं. ३, केशरदिप कॉम्प्लेक्स, एन- ७, सिडको पोलीस स्टेशन जवळ, औरंगाबाद (महा.)- ४ ३ १ ० ० ३ येथे प्रसिध्द केले.

• **संपादक : रशपालसिंग निरंजनसिंग अट्टल** • मो. **7588166496** • Email : **attalsanket2023@gmail.com** • **RNI No. MAHMAR/2023/87816**

This Daily Printed, Published and Owned by **RASHPALSINGH NIRANJANSINGH ATTAL** Printed at Mansi Printers, Plot No. 45 A, Service Industry Sector, Aurangabad (M.S.)- 431005 and Published at Shop No. 3, Keshardeep Complex, N-7, Near Cidco Police Station, Aurangabad (M.S.)- 431003

• **Editor : RASHPALSINGH NIRANJANSINGH ATTAL** • मो. **7588166496** • Email : **attalsanket2023@gmail.com** • **RNI No. MAHMAR/2023/87816**